दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक सागर राणा अभोरे संपादक बडूभाऊ इगोले
वाशीम ■ बुधवार दिनांक 14 मे 2025 ■ वर्ष : 1 ले ■ अंक : 350 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रुपये ■ Title code:- MAHMUL03935

# काश्मीरप्रश्न द्विपक्षीय, 'तिसऱ्या'ची लुडबूड नको!

महाराष्ट्र जीत

**नवी दिल्ली : जम्मू-काश्मीर प्रश्न भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील आहे. त्यात कोणत्याही 'तिसऱ्या'ची लुडबूड नको. हा प्रश्न भारत आणि पाकिस्तान आपापसात सोडवतील, असे भारताने मंगळवारी जगाला ठणकावले. पाकिस्तानला पाकव्याप्त काश्मीर रिकामा करावा लागेल. सर्व प्रश्न द्विपक्षीय मार्गाने निकाली काढले जातील, असे परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी सांगितले.**

## भारताने ठणकावले



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जम्मू-काश्मीर प्रश्न सोडवण्यासाठी मध्यस्थीस तयार असल्याचे जाहीर केले होते. त्या पार्श्वभूमीवर भारताने मंगळवारी आपली भूमिका जाहीर केली.

जैस्वाल म्हणाले की, जम्मू-काश्मीर मुद्यावर तिसऱ्या देशाचा हस्तक्षेप मंजूर नाही. हा मुद्दा भारत-पाकिस्तान आपापसात चर्चेने सोडवतील. यात कोणताही बदल होणार नाही. तसेच केवळ पाकव्याप्त काश्मीरबाबत दोन्ही देशांमध्ये चर्चा होईल, असे त्यांनी सांगितले.

ट्रम्प यांच्या अणुयुद्धाच्या अटकळींवर बोलताना ते म्हणाले की, ही लष्करी कारवाई पूर्णपणे पारंपरिक पद्धतीने राबवण्यात आली. राष्ट्रीय कमांड प्राधिकरणाची १० मे रोजी बैठक होणार आहे, अशी बातम्या होत्या. मात्र, त्यांनी हे नाकारले.

पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांनीही स्वतः अणुयुद्धावर बोलणे फेटाळले होते. आम्ही अण्वस्त्र ब्लॅकमेलला बळी पडणार नाही किंवा सीमापार दहशतवाद घडवू देणार नाही, अशी भारताची ठाम भूमिका आहे, असे जैस्वाल म्हणाले.

## सिंधू जल करार स्थगित राहणार

जैस्वाल म्हणाले की, भारत-पाकिस्तान युद्धविरामानंतरही सिंधू जल करार स्थगित राहणार आहे. मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीच्या निर्णयानुसार, पाकिस्तान जोपर्यंत सीमेपलिकडून दहशतवादाला आपले समर्थन देणे बंद करत नाही, तोपर्यंत हा करार स्थगित राहील. अनेक दशकांपासून पाकिस्तान सीमेपलिकडून दहशतवादाला पाठिंबा देत आहे.

# 'सीबीएसई'च्या दहावीच्या निकालात मुलींनी मारली बाजी

**नवी दिल्ली** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने ( सीबीएसई) दहावी व बारावीचा निकाल मंगळवारी जाहीर केला. दहावीत ९३.६० टक्के तर बारावीत ८८.३९ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदा दहावी व बारावीसाठी ४४ लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. निकालात मुलींनीच बाजी मारली आहे. दहावीत मुलींचा निकाल ९५ टक्के तर मुलांचा निकाल ९३.६३ टक्के लागला. मुलींचा निकाल मुलांपेक्षा २.३७ टक्के अधिक लागला. तर बारावीत मुलींचा निकाल ९१.६४ टक्के तर मुलांचा निकाल ८५.७० टक्के लागला.

**दहावीचा ९३.६० टक्के, तर बारावीचा ८८.३९ टक्के निकाल**

संमिश्र पानावर

# दहावीत कोकणच अव्वल

महाराष्ट्र जीत

**पुणे** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी- मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेचा ऑनलाइन निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आला. राज्याचा दहावीचा निकाल ९४.१० टक्के इतका लागला असून मागील वर्षाच्या तुलनेत हा निकाल १.७१ टक्क्याने कमी आहे. यंदाही मुलींनीच निकालात बाजी मारली आहे. उत्तीर्ण झालेल्या मुलींची टक्केवारी ९६.१४ आहे, तर मुलांची टक्केवारी ९२.२१ टक्के आहे. नऊ विभागीय मंडळात यंदाही कोकण विभाग अव्वल असून नागपूर विभाग शेवटच्या क्रमांकावर आहे.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत निकालाची माहिती दिली. गोसावी म्हणाले, यंदा दहावीचा निकाल का घटला याचे नेमके कारण देता येणार नाही. कारण दरवर्षी निकालात वाढ किंवा घट होतच असते. प्रश्नपत्रिकेची काठिण्यपातळी कमी-जास्त होत असते. बारावीच्या परीक्षेप्रमाणेच दहावीच्या परीक्षेतही कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली होती. त्यात ३७ केंद्रांवर गैरप्रकार घडले. आता तपासणी, चौकशी करून संबंधित केंद्रांपैकी दोषी केंद्रे कायमस्वरुपी बंद करण्याचा निर्णय घेण्यात येईल. या अभियानामध्ये भरारी पथके, बैठी पथके, आकस्मिक भेटी अशा उपाययोजना करण्यात आल्या होत्या.

राज्यभरातील ३७ परीक्षा केंद्रांवर कॉपीची प्रकरणे निदर्शनास आली.

संमिश्र पानावर



## विभागनिहाय टक्केवारी

- कोकण : ९९.८२ टक्के
- मुंबई : ९५.८४ टक्के
- पुणे : ९४.८१ टक्के
- नागपूर : ९०.७८ टक्के
- संभाजीनगर : ९२.८२ टक्के
- कोल्हापूर : ९६.७८ टक्के
- अमरावती : ९२.९५ टक्के
- नाशिक : ९३.०४ टक्के
- लातूर : ९२.७७ टक्के

## यंदाही मुलींनी मारली बाजी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेमध्ये एकूण १४ लाख ५५ हजार ४३३ उत्तीर्ण झाले आहेत. यंदा मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९६.१४ टक्के आहे, तर मुलांची टक्केवारी ९२.३१ आहे. म्हणजेच मुलींचा निकाल ३.८३ टक्के जास्त आहे.

## २११ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण तर २८५ विद्यार्थ्यांना ३५ टक्के गुण

राज्यातील शिक्षण मंडळाच्या एकूण ९ विभागांमध्ये २११ विद्यार्थ्यांना १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. तर २८५ विद्यार्थीहे ३५ टक्के गुण मिळवून काठावर पास झाले आहेत. ३५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची सर्वाधिक संख्या पुण्यात आहे. तर कोकणाचा निकाल अव्वल असून कोकणात एकाही विद्यार्थ्याला ३५ टक्के गुण मिळालेले नाहीत.

## ७,९२४ शाळांचा निकाल १००%

राज्यातील २३,४८९ माध्यमिक शाळांतून १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७,९२४ शाळांचा निकाल १०० % लागला आहे.

# ऑपरेशन सिंदूर ही पाकसाठी 'लक्ष्मणरेषा'- नरेंद्र मोदी

■ 'भारत माता की जय' ही केवळ घोषणाच नाही तर प्रत्येक सैनिकाची शपथ

महाराष्ट्र जीत

**नवी दिल्ली** : 'भारत माता की जय' या घोषणेची ताकद नुकतीच जगाने पाहिली. ही केवळ घोषणाच नाही, तर देशातील प्रत्येक जवान भारतमातेच्या सन्मान आणि प्रतिष्ठेसाठी जीवाची बाजी लावतो, त्या प्रत्येक सैनिकाची ही शपथ आहे. देशातील प्रत्येक नागरिकांचा हा आवाज आहे, 'भारत माता की जय' हा आवाज मैदानातही घुमतो आणि 'मिशन'मध्येही घुमतो, असे स्पष्ट करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ऑपरेशन सिंदूर' ही पाकिस्तानसाठी 'लक्ष्मणरेषा' असल्याचे मंगळवारी ठणकावून सांगितले.

भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांना उद्ध्वस्त करत मोठी कारवाई केली. या कारवाईनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी आदमपूर हवाई तळावर

संमिश्र पानावर

## घरात घुसून मारू!

ज्या पाकिस्तानी सैन्यावर हे दहशतवादी अवलंबून होते त्यांना भारतीय लष्कर, भारतीय हवाई दल आणि भारतीयांनी पराभूत केले आहे. भारतीय सैन्याने पाकिस्तानी सैन्याला हेही दाखवून दिले की पाकिस्तानमध्ये अशी कोणतीही जागा शिल्लक नाही जिथे दहशतवादी आरामात श्वास घेऊ शकतील. आम्ही घरात घुसून मारू आणि तुम्हाला पळून जाण्याची एकही संधी देणार नाही, असे पंतप्रधानांनी म्हटले आहे. भारताचे सैनिक जेव्हा 'भारतमाता की जय' बोलतात, तेव्हा दुश्मनांचा थरकाप उडतो. जेव्हा आपले क्षेपणास्त्र निशाण्यावर पोहोचते तेव्हा दुश्मनांनाही 'भारतमाता की जय' ही घोषणा ऐकायला जाते. जेव्हा आमची सेना अणुबॉम्बच्या धमकीची हवा काढतात, तेव्हा आकाशापासून ते पाताळापर्यंत एकच आवाज घुमतो तो म्हणजे 'भारत माता की जय'. आज भारतीय जवानांनी सर्व भारतीयांची मान उंचावली आहे, असे मोदी म्हणाले.

## तिन्ही दलांना सलाम

सकाळीच मी आपल्याला भेटायला आणि दर्शनासाठी आलो आहे. जेव्हा वीरांच्या दर्शनाचा योग येतो, तेव्हा जीवन धन्य होते, आज मी आपल्या दर्शनासाठी आलो आहे. येणाऱ्या पिढीसाठी आपले जवान प्रेरणा आहेत. मी देशातील जवानांना सलाम करतो. 'ऑपरेशन सिंदूर' हे साधे अभियान नाही, तर निर्णायक क्षमतांची त्रिवेणी आहे. भारत बुद्धांची धरती आहे आणि गुरु गोविंद सिंह यांचीही धरती आहे. आपल्या धर्माच्या रक्षणासाठी शस्त्र उचलणे ही आपली परंपरा आहे. जेव्हा आपल्या बहिणी आणि मुलींचे कुंकू पुसले गेले तेव्हा आपण दहशतवाद्यांच्या घरात घुसून त्यांचे पंख छाटले. भारतीय जवानांचे शौर्य इतिहासात कायमस्वरूपी कोरले जाईल, आपले लष्कर, हवाईदल आणि नौदल यांना मी सलाम करतो, असेही मोदी म्हणाले.



## पाकिस्तानी अधिकाऱ्याला देश सोडण्याचे आदेश

महाराष्ट्र जीत

**नवी दिल्ली** : नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायोगात काम करणाऱ्या एका पाकिस्तानी अधिकाऱ्याला भारतातील त्याच्या अधिकृत दर्जाशी जुळत नसलेल्या कारवाया केल्याबद्दल भारत सरकारने अयोग्य व्यक्ती म्हणून घोषित केले आहे. या अधिकाऱ्याला २४ तासात भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहे. पाकिस्तानउच्चायोगाच्या चार्ज डी अफेयर्सना याबाबत एक डिमार्च जारी करण्यात आला आहे, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिले.

# जम्मू-काश्मीरमध्ये तीन दहशतवाद्यांचा खात्मा

महाराष्ट्र जीत

**श्रीनगर** : सुरक्षा दलांनी जम्मू-काश्मीरच्या शोपियान जिल्ह्यात मंगळवारी झालेल्या चकमकीत 'लष्कर-ए-तोयबा'च्या कमांडरसह तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला. यामध्ये 'लष्कर-ए-तोयबा'चा म्होरक्या शाहीद गुट्टे याचा समावेश आहे.

शोपियान जिल्ह्यातील शुकरू केलर परिसरात दहशतवादी लपून बसले असल्याची खबर मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी या परिसराला वेढा घालून शोधमोहीम हाती घेतली. तेव्हा दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला. त्याला सुरक्षा दलांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले.

सुरक्षा दलांच्या कारवाईत ठार झालेले दहशतवादी 'लष्कर-ए-तोयबा'चे होते. त्यापैकी दोन

संमिश्र पानावर

# भूषण गवई सरन्यायाधीशपदाचा कार्यभार आज स्वीकारणार

**नवी दिल्ली** : सुप्रीम कोर्टाचे ज्येष्ठ न्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांची नवे सरन्यायाधीश म्हणून निवड झाली असून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांच्या नावाला मंगळवारी मंजुरी दिली. गवई हे बुधवारपासून सरन्यायाधीशपदाचा कार्यभार सांभाळतील. गवई हे देशाचे ५२ वे सरन्यायाधीश असतील. तर दलित

संमिश्र पानावर

## कोणतेही पद स्वीकारणार नाही ! - खन्ना

सेवा निवृत्तीनंतर मी कोणतेही सार्वजनिक पद स्वीकारणार नाही, अशी घोषणा मावळते सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी केली. खन्ना यांचा सरन्यायाधीशपदाचा मंगळवारी शेवटचा दिवस होता. न्या. यशवंत वर्मा वादाबाबत पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, मी कोणतीही गुप्तता पाळत नाही. न्यायाधीश तथ्याच्या आधारावर काम करतात. न्यायालयीन कामकाजात निष्पक्ष निर्णय घेणे व तार्किक दृष्टीकोन गरजेचा आहे. न्यायपालिका सकारात्मक आणि नकारात्मक पैलू पाहते. त्यानंतर तर्काच्या आधारावर निर्णय दिले जातात. भविष्यकाळ सांगतो, आम्ही जो निर्णय घेतला तो किती योग्य होता, असे त्यांनी नमूद केले.

# अमली पदार्थसाठ्याप्रकरणी उद्योगपतीचा जामीनअर्ज फेटाळला

**नवी दिल्ली** : मुंद्रा बंदरात जप्त करण्यात आलेल्या २१ हजार कोटी रुपयांच्या अमली पदार्थ तस्करीप्रकरणी अटक करण्यात आलेल्या दिल्लीस्थित उद्योगपतीचा जामीनअर्ज मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला. या तस्करीतून मिळालेल्या पैशातून 'लष्कर-ए- तोयबा' या दहशतवादी संघटनेला आर्थिक मदत केल्याचा या उद्योगपतीवर आरोप आहे.

न्या. सूर्य कांत आणि न्या. एन. कोटिश्वर सिंह यांच्या पीठाने उद्योगपती हरप्रीतसिंग तलवार ऊर्फ



कबीर तलवार याला सहा महिन्यांनंतर जामीनअर्ज करण्याची मुभा दिली आहे. तलवार याच्यावर दहशतवादाला आर्थिक मदत देण्याचे केलेल आरोप अकाली असल्याचे पीठाने म्हटले आहे.

या खटल्याची सुनावणी जलद करण्यासाठी महिन्यातून दोनदा खटला सूचीबद्ध करण्याचे निर्देश विशेष न्यायालयाला देण्यात आले आहेत. सुप्रीम कोर्टाने २३ एप्रिल २०२५ रोजी जामीन अर्जावर निकाल राखून ठेवला होता. राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) यापूर्वी म्हटले होते की ड्रग्ज विक्रीतून मिळालेले पैसे 'लष्कर-ए-तैयबा'च्या दहशतवादी कारवायांना वित्तपुरवठा करण्यासाठी वापरले जात होते. याप्रकरणी राष्ट्रीय राजधानीत काही क्लब चालवणाऱ्या हरप्रीत तलवारला ऑगस्ट २०२२ मध्ये एजन्सीने अटक केली होती.



# मुंबई, पुण्यासह काही जिल्ह्यांत अवकाळी पावसाची हजेरी

महाराष्ट्र जीत

**पुणे** : राज्यभरात मागील काही दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. मंगळवारी मुंबई, पुणे, नाशिक, सातारा तसेच इतर काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस झाला. मुंबईसाठी दोन दिवस पावसाचा 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. ठाणे आणि मुंबईमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण कोकणासाठीही यॅलो अलर्ट' जारी करण्यात आला असून अहिल्यानगरसह कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर या जिल्ह्यांतील घाट भागातही पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

विदर्भातील पाच जिल्ह्यां साठी हवामान विभागाच्या नागपूर प्रादेशिक केंद्राने बुधवार, १४ मे आणि गुरुवार १५ मेसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. गोंदिया, भंडारा, गडचिरोली, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये जोरदार अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील दोन दिवस विदर्भातील आकाश ढगांनी आच्छादलेले राहील. बुधवारी

संमिश्र पानावर

## मान्सून अंदमानमध्ये

हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजाप्रमाणे मंगळवारी (दि.१३ मे) नैऋत्य मोसमी वारे अर्थात मान्सून अंदमानात दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, निकोबार बेटांवर मागील २४ तासांत सर्वत्र जोरदार पाऊस झाला आहे. दक्षिण बंगालच्या उपसागराचा काही भाग, दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेट आणि उत्तर अंदमान समुद्राच्या काही भागात मान्सून दाखल झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. दरम्यान, महाराष्ट्रात ६ जून रोजी मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## संस्थानच्या संपत्तीत तब्बल अडीचशे कोटी रुपयांची वाढ

# साई संस्थानच्या तिजोरीत ५०० किलो सोने जमा

महाराष्ट्र जीत

**शिर्डी** : शिर्डीच्या साईबाबांच्या चरणी भक्तांकडून नेहमीच सढळ हस्ते देणग्या दिल्या जातात. भक्तांच्या दानशूरपणामुळे साई संस्थानच्या तिजोरीत सुमारे ५०० किलो सोने जमा झाले असून त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे आता हे सोने ठेवायला जागा कमी पडत आहे.



साई संस्थानच्या तिजोरीत आतापर्यंत पाचशे किलो सोने जमा झाले असून यामध्ये दागिने स्वरूपातील सोने अधिक आहे. विशेष म्हणजे सोन्याच्या भावात गेल्या काही वर्षात दुपटीने वाढ झाल्याने साई संस्थानच्या संपत्तीत तब्बल अडीचशे कोटी रुपयांची भर पडली आहे. सध्या भक्तांच्या सोने स्वरूपातील देणग्या ठेवण्यासाठी साई संस्थानकडे जागा कमी पडत आहे.

साई संस्थानकडे जमा असलेल्या सोन्याच्या साठ्यात शंभर किलो वजनाचे साई सिंहासन तसेच सुबक आणि मौल्यवान दागिन्यांचा समावेश असून, हे दागिने सुरक्षित ठेवावेत, असा आदेश न्यायालयाने दिला आहे. एकूण ५०० किलो सुवर्ण साठ्यापैकी सुमारे अडीचशे किलो सोने वितळवण्यायोग्य असल्याचे सांगण्यात येते. त्यापैकी सुमारे १४० किलो वजनाच्या वस्तू वितळवून त्यापासून सुवर्ण नाणी तयार करण्याचा निर्णय साई संस्थानने

संमिश्र पानावर

## सोने ठेवायला विस्तारीत जागेची गरज

संस्थानने स्टेट बँकेकडे सोने ठेवायला दिले, तर त्यावर त्यांना अडीच टक्के व्याज मिळू शकते. परंतु, ही बाब न्यायप्रविष्ट असल्याने साई संस्थान कोंडीत सापडले आहे. ही परिस्थिती जर अशीच राहिली तर साई संस्थानला देणगी स्वरूपात येणारे सोने साठवण्यासाठी विस्तारीत जागेची तजवीज करावी लागणार आहे.

## संपादकीय

# स्वाभिमानाची प्रेरणा देणारा छावा महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज.

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे इ.स.१६५७ रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला.राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला. या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले. परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले. त्यावेळी संभाजीराजे फक्त ९ वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरूप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या १२ दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.१६८२ साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारूगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत ५ पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला. त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला.त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरूद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.१६८९ च्या सुरूवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली.यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते.परंतु वतनाच्या मुद्द्यावरून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला. यालाच म्हणतात "घर का भेदी लंका ढाये"१ फेब्रुवारी इ.स.१६८९ रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला. मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली.मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले.अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही.संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले. हे सगळं संभाजीं महाराज ४० दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व ११ मार्च १६८९ रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करून त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?"याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे ३२ व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी, आरोग्य , शिक्षण इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल. कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे. याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे. धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पीत आहे व शोषण करीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी.यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करून पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची संपूर्ण खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार) नागपूर.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांना दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश - निकालाचा टक्का ९०.४५%

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके)**
मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांमधील दहावीच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या बोर्डाच्या परीक्षेत अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश मिळवत, महापालिकेच्या शाळेतील निकालाचा टक्का ९०.४५% इतका लागला आहे. यंदा एकूण २४१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यापैकी २१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हे यश शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षकांचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फलित आहे. या यशामध्ये विशेष उल्लेखनीय कामगिरी शाळा क्रमांक ०४ मधील कुमारी प्रीती गायकवाड हिने केली असून तिने सर्वाधिक ८५% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच शाळेतील कुमारी निर्मला प्रजापती हिने ८३.८०% गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये शाळा क्रमांक ०३ मधील कुमारी ज्योती शिरसाट आणि शाळा क्रमांक ०४ मधील कुमारी भाग्यश्री बंडे यांचा समावेश असून त्यांनी अनुक्रमे ८२% गुण मिळवले आहेत. या विद्यार्थिनींच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे. त्यांचे आणि त्यांच्या शिक्षकांचे महापालिका शिक्षण विभागाच्यावतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. मागील वर्षी निकालाचा टक्का ६५% होता, तर यावर्षी तो ९०.४५%



इतका झाल्याने निकालात लक्षणीय वाढ झाली असून, ही महापालिका शाळांच्या गुणवत्तापूर्ण प्रगतीची स्पष्ट साक्ष आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबीनोद शर्मा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले असून, त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगितले की, "ही यशोगाथा शिक्षकांच्या परिश्रमांची आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीची आहे. महापालिका शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नवे उपक्रम राबवत आहे." मनपा शाळांमध्ये नियमितपणे विविध कला व क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. तसेच, बोर्ड परीक्षा व इतर राज्यस्तरीय शैक्षणिक स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. पालिकेच्या ३६ शाळांतील एकूण ९७ वर्ग डिजिटल करण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार शिक्षण मिळते आहे. शिक्षक वर्ग विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर विशेष भर देत असून, विशेष शिक्षण सत्र, वैयक्तिक मार्गदर्शन अशा माध्यमातून विद्यार्थ्यांना सशक्त केले जात आहे.

यावर्षी राबविण्यात आलेल्या पालकत्व उपक्रमास विशेष यश प्राप्त झाले असून, या उपक्रमांतर्गत प्रत्येक शिक्षकाला ८ ते १० विद्यार्थ्यांचे पालकत्व देण्यात आले होते. यामुळे विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन मिळून त्यांच्या अभ्यासात लक्षणीय प्रगती दिसून आली. हा निकाल आणि यामागील प्रयत्न हे दर्शवतात की, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असून विद्यार्थ्यांना केवळ उत्तीर्णच नव्हे तर सक्षम, सुजाण नागरिक बनवण्याच्या दिशेने भक्कम पावले उचलत आहे.

# शालांत परीक्षेत,अपंगत्वावर मात चिन्मयी रहाणेची यशस्वी घोडदौड

भिवंडी (सुनील झळके) बारावीच्या निकालानंतर आज अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर दहावीच्या शालांत परीक्षा 2025 चे निकाल जाहीर झाले. यामध्ये पालघर जिल्हा विक्रमगड तालुक्यातील भोपोली गावातील श्रीमती कमलाबाई जयंतीलाल जोगानी हायस्कूलची आदिवासी समाजातील विद्यार्थिनी कु. चिन्मयी विनोद रहाणे हिने आपल्या अपंगत्वावर मात करून शालांत परीक्षेमध्ये एकूण 89.80% गुण मिळवून यशस्वी घोडदौड केली आहे.

चिन्मयने तिच्या वर्गातील मार्गदर्शक वर्गशिक्षक, आई वैष्णवी रहाणे (माजी सदस्य पालघर जिल्हा परिषद) व वडील विनोद रहाणे यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे तिला एक अभ्यासाची दिशा दिल्याने व तिच्याकडून अत्यंत परिश्रमपूर्वक अभ्यासाची तयार करून घेतल्यानेच तिने हे घवघवीत यश संपादन केले आहे. चिन्मयीला वाचनाचे प्रचंड आवड असून,तिने प्रशासन सेवेत तहसीलदार म्हणून काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे तिने मिळवलेल्या यशाबद्दल समाजातील सर्व स्तरावर तिचे कौतुक होत असून तिच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# पी एम मोदी म्हणतात फक्त विध्वंस होईल. भारताची त्रिसूत्री.

**अविनाश जाधव प्रतिनिधी**
**कळंबोली वार्ताहरः-** सोमवारी दि. १२ मे रात्री आपले लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या निवेदनामध्ये 'ऑपरेशन सिंदूर' हे यशस्वीरित्या राबविल्याबद्दल आपल्या तीनही दलाचे जवान, हवाई सुरक्षा यंत्रणा मजबूत आणि सुरक्षित करणारे शास्त्रज्ञ यांचे कौतुक केले होते आणि त्यांना सॅल्यूटही केला होता. त्यानंतर आज पंतप्रधान यानी हवाई दलाच्या आदमपूर तळाला भेट दिली. यावेळी सैनिकांना संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी सैनिकांच्या शौर्याला एक मोठा सलाम केला. यावेळी त्यांनी अतिरेक्यांना आश्रय देणारे जे सरकार आहे त्यांना आणि अतिरेकी यांना वेगळे समजणार नाही, भारत आपल्या शर्थीवर शत्रूला उत्तर देणार, कुठलीही न्युक्लिअर ब्लॅकमेलिंग भारत सहन करणार नाही. अशी त्रिसुत्रीही सांगितली. "भारत माता की जय" फक्त घोषणा नाही ही त्या प्रत्येक सैनिकाची शपथ आहे जो भारतमातेसाठी जिवाची बाजी लावतो. 'भारत माता की जय' मैदानात ही घुमतो आणि मोहिमेतही घुमते. भारताचे सैनिक भारत माता की जय म्हणतात तेव्हा शत्रुंचे काळीज चिरते. जेव्हा आपले ड्रोन, मिसाईल लक्ष्यांवर केंद्रीत होतात तेव्हा शत्रुंना भारत माता की जय ऐकू येते, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी सैनिकांचे कौतुक केले.



तसेच "जेव्हा आपले सैन्य न्युक्लिअर ब्लॅकमेलच्या धमकीची हवा काढतात तेव्हा आकाश ते पाताळ फक्त भारतमातेचाच जयघोष होतो. तुम्ही प्रत्येक भारतीयाची मान उंचावली आहे. तुम्ही नवा इतिहास रचला आहे. मी आज तुमचे दर्शन करायला आलो आहे. शूरविरांचे पाय जमिनीवर पडतात तेव्हा धरती धन्य होते. अशा विरांचे दर्शन मिळाले की आयुष्य धन्य होते. भारताच्या पराक्रमाची कायम चर्चा होईल त्यामधला सर्वात महत्वाचा अध्याय तुम्ही आणि तुमचे असतील. मी विरांच्या या धरतीवरुन एयरफोर्स, नेव्ही, सर्वांना सलाम करतो, असेही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले

# धाबेकर विद्यालय यावर्डीचा निकाल ८७.०९%

## (३१ पैकी २७ विद्यार्थी उत्तीर्ण, प्रिया राजाराम इंगळे ८५.४०% गुण मिळवून शाळेतून प्रथम,११ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत)

महाराष्ट्र जीत

कारंजा :- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च मध्यमिक शिक्षण मंडळाने १३ जून रोजी माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा मार्च २०२५ चा ऑनलाईन निकाल घोषित केला आहे.त्यामध्ये बाबासाहेव धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डीचा माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परिक्षा २०२५ चा निकाल ८७.०९ लागला आहे.

सदर परिक्षेला या विद्यालयातून ३१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.त्यापैकी ११ विद्यार्थी प्राविन्य श्रेणीत, १२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ०३ विद्यार्थी, उत्तीर्ण श्रेणित ०१ विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत.

कु. प्रिया राजाराम इंगळे या विद्यर्थिनीने ८५.४०% गुण प्राप्त करून विद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. दर्शन विश्वनाथ ठाकरे याने ८१.२०% गुण घेऊन द्वितीय क्रमांक, कु. दिव्या ईश्वर मडामे हीने ८१% गुन मिळवून तृतीय क्रमांक, दिव्यानी नवनाथ डुकरे हीने ८०.६०% गुन घेवून चवथी तर कु. नियती संतोष घोडराव कु.वैष्णवी राजेंद्र ठाकरे यांनी




८०.२०% गुन घेवून पाचवा क्रमांक प्राप्त केला आहे. शाळेचे संस्थाध्यक्ष योगेश केशवराव खोपे, मुख्याधापक विजय देविदास भड, शिक्षक राजेश शेंडेकर, शालिनी ओलीवकर, गोपाल काकड, अनिल हजारे, शिक्षकेत्तर कर्म देविदास काळबांडे ,भालचंद्र कवाने, राजु लबडे, राजेंद्र उमाळे, राजेश लिंगाटे यांनी अभिनंदन केले आहे.

# सन्मती ज्ञानमंदिर इंग्लिश स्कूल चा १००% निकाल.

## शहराच्या शैक्षणिक उज्वल परंपरेत घातली भर.

महाराष्ट्र जीत

**कारंजा लाड** – सन्मती ज्ञानमंदिर इंग्लिश स्कूल, कारंजा लाड या शाळेच्या इ. १० वी (२०२४-२५) च्या पहिल्या बॅचचा निकाल १००% लागून शाळेने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. पहिल्याच बॅचमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होऊन शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामध्ये यशिता राजू भगत हिने ९६% गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला असून तिची ही कामगिरी अत्यंत उल्लेखनीय आहे. त्याचप्रमाणे निकिता राजू भगत हिला ९४.२०% गुण प्राप्त झाले असून तीने दुसऱ्या क्रमांकावर आपले यश सिद्ध केले आहे. तसेच हर्षित सारंग नायसे ह्याला ८९.६०% गुण प्राप्त होऊन तृतीय क्रमांक घेऊन त्याने आपले यश संपादन केले आहे. या घवघवीत यशाचे श्रेय विद्यार्थ्यांच्या मेहनतीबरोबरच शिक्षकांचे परिश्रम, पालकांचे सहकार्य व शाळेच्या व्यवस्थापनाच्या दूरदृष्टीला जाते. शाळेचे संचालक मंडळ, मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद यांनी सर्व



यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या निकालामुळे सन्मती ज्ञानमंदिर इंग्लिश स्कूलने शैक्षणिक गुणवत्तेच्या दिशेने एक भक्कम पाऊल टाकले असून, भविष्यातही अशाच प्रकारे यशाचे शिखर गाठण्याचा निर्धार शाळेने व्यक्त केला आहे. संमती विद्या मंदिर व इंग्लिश स्कूल ने इयत्ता दहावी च्या पहिल्या बॉच ला विद्यार्थ्यांनी मिळविले यश हे प्रशनिय असून शहराच्या शैक्षणिक उज्वल परंपरेत भर घालणारे आहे असे मत संस्थेच्या अध्यक्षा सौ चवरे यांनी व्यक्त केले आहे

# जप्त वाळू साठ्यातून वाळू उपलब्ध करून देणार

## सहाय्यक जिल्हाधिकारी झेनिथ चंद्र दोंथूलां यांचे शिष्टमंडळाला आश्वासन

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**
श्रीक्षेत्र माहूर शहरासह तालुक्यातील हजारो घरकुल लाभार्थ्यासह वैयक्तिक बांधकाम करणाऱ्या नागरिकांना गेल्या दोन महिन्यापासून वाळू उपलब्ध नसल्याने बांधकाम रखडले असून पावसाळा तोंडावर आल्याने तसेच हजारो कामगारावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळल्याने माहूर शहरातील शिष्टमंडळाने माहूर येथे आलेल्या सहाय्यक जिल्हाधिकारी जझे नीथ चंद्र दोंथूलां यांची भेट घेतली असता त्यांनी जप्त केलेल्या वाळू साठ्यातून नागरिकांना येत्या दोन ते तीन दिवसात वाळू उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन दिले यावेळी तहसीलदार किशोर यादव नायब तहसीलदार डॉ राजकुमार राठोड नायब तहसीलदार कैलास जेठे यांचे सह मान्यवरांची उपस्थिती होती गेल्या दोन महिन्यापासून माहूर तालुक्यातील बांधकामे वाळून नसल्याने बंद असून पंचायत समितीकडून गतवर्षीची घरकुल आणि यावर्षीची वाटण्यात आलेली सात हजारावर घरकुले तसेच माहूर शहरातील दीड ते दोन हजार घरकुलाची कामे वाळू नसल्याने ठप्प असून घरकुल लाभधारक पावसाळा तोंडावर आल्याने घाबरलेल्या अवस्थेत असून प्रचंड महाग असलेली पिवळी वाळू घेणे शक्य नसल्याने शासनाकडून मोफत वाळू आणण्यासाठीही तीन ते चार हजार रुपये खर्च येत असल्याने घरकुलधारक त्रस्त तर इतर वैयक्तिक बांधकाम करणारे नागरिक ही वाळूपाई उघड्यावर असल्यासारखेच आहेत त्यामुळे माहूर शहरातील काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस आनंद तूपदाळे पत्रकार जयकुमार अडकिने पत्रकार बावाणी पत्रकार राज ठाकूर सामाजिक कार्यकर्ते तथा व्यवसायिक जितू चोले तसेच लांजि चे सरपंच तथा माजी पंचायत समितीचे सभापती मारुती रेकुलवार यांचे सह मान्यवरांनी माहूर येथे आलेले सहाय्यक जिल्हाधिकारी झेनिथ चंद्र दोंथूलां यांची भेट घेऊन निवेदन दिले असता त्यांनी तालुक्यात अनेक ठिकाणी जप्त केलेली 419 जप्त वाळू साठ्यातून दोन ते तीन दिवसात वाळू विक्रीची परवानगी देणार देणार असल्याचे आश्वासन दिले सहाय्यक जिल्हाधिकारीचे झेनीथ चंद्र दोंथूलां यांनी दोन ते तीन दिवसात जप्त वाळू साठ्यातून नागरिकांना वाळू उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन दिल्याने उपस्थित मान्यवरांनी त्यांचे आभार मानले




# गोपाल दातकर यांना हायकोर्टाकडून अंतरिम जामीन मंजूर

## मजीप्रा च्या अधिकाऱ्याला शिवीगाळ प्रकरण

**अकोला जिल्हा**
**प्रतिनिधी दानिश चौधरी**

महाराष्ट्र जीत



अकोला-शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांच्याशी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अकोट येथील अधिकाऱ्याने संजय आठवले यांचा फ़ोन वरून संवाद साधला व संवादा दरम्यान गोपाल दातकर यांनी जातीवाचक शिवीगाळ व खंडणी मगितल्याचा आरोप केला आहे. या संदर्भात विविध कलमांव्यये गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान अकोट सत्र न्यायालयात २१ एप्रिल रोजी अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला असता दातकर यांचा अर्ज न्यायालयाकडून फेटाळण्यात आला होता. दरम्यान त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली न्या वृषाली जोशी यांच्या बेंचसमोर 13 मे रोजी झालेल्या सुनावणीत त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. गोपाल दातकर हे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य असून त्यांच्या सर्कलमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या अंतर्गत काम सुरू आहे. या कामाच्या संदर्भात त्यांनी मजीप्राच्या अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क केला. या दरम्यान दोघांमध्ये चांगलाच वाद झाला फिर्यादी यांनी तक्रारीत दाखल केल्याप्रमाणे जातीवाचक शिवीगाळ करून खंडणी देखील मागितल्याचे नमूद केले आहे.त्यामुळे या प्रकरणात अकोट येथे झालेल्या २१ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान सरकारी पक्षातर्फे विरोध करण्यात आला व जमानात अर्ज फेटाळून लावला होता. दरम्यान गोपाल दातकर यांनी उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथे अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला असता न्यायाधीश मा वृषाली जोशी यांनी १३ मे रोजी त्यांना दोन्ही बाजू ऐकून १५००० रुपयाच्या जात मुचालका आणि अर्जदारास आठवड्यातून एकदा म्हणजे मंगळवारी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत संबंधित पोलिस ठाण्यात उपस्थित राहावे लागेल आणि आवाजाचा नमुना देऊन तपास यंत्रणेला सहकार्य करावे लागेल या अटी वर जामीन मंजूर करण्यात आला आहे. अर्जदाराच्या वतीने अड. आनंद राजन देशपांडे आणि अड. श्रीराम धैर्यवर्धन पुंडकर यांनी बाजू मांडली.


महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्यम प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी - ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )



-प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते स्वर्गीय दि.बा. पाटील यांच्या कार्याची माहिती शालेय विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात त्यांच्या प्रतिमेसह त्यांच्या जीवन प्रवासातील महत्त्वपूर्ण घटना आणि कार्याची माहिती विद्यालयाच्या भिंतींवर शिल्पमध्ये आकर्षकपणे रेखाटण्यात आली आहे. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सोमवारी या उपक्रमाची पाहणी करून आढावा घेतला तसेच आवश्यक त्या सूचना केल्या. यावेळी त्यांच्यासोबत दि.बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, डॉ.सुरेखा मोहोकर प्रभाग १९ चे अध्यक्ष पवन सोनी, महापालिकेचे अधिकारी संजय कटेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन तर्फे जागतिक परिचारिका दिनानिमित्त परिचारिकांचा सन्मान...

## परिचारिकांनो...! तुमच्या सेवाभावाला सलाम....

**पनवेल प्रतिनिधी**

पनवेलमधील नेहमीच महिलांसाठी कार्यरत असणारी एकमेव संस्था ती म्हणजे क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन होय. महिलांना न्याय आणि सन्मान मिळवून देणारी ही संस्था असून संस्थापक/अध्यक्षा सौ.रुपालीताई शिंदे यांनी आज दि.१२ मे २०२५ रोजी जागतिक परिचारिका दिनानिमित्त क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन तर्फे परिचारिकांचा छोटेखानी कार्यक्रम घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. प्रत्येक रुग्णाशी कसलाही दुजाभाव न करता शुश्रूषा करत आहेत. सध्या रुग्णांच्या सगळ्यात जवळची नातेवाईक ही परिचारिकाच असून,त्या 'सिस्टर' या नात्याने पूर्ण सेवा देत आहेत. ह्या नारी शक्तींना त्यांच्या सन्मानप्रीत्यर्थ त्यांना केक कापून व सन्मानचिन्ह देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रम निकम परमार हॉस्पिटल

याठिकाणी डॉक्टर माळी यांच्या सहकार्याने परिचारिका सौ अश्विनी पाटील, सौ दुर्गा पाटील, कुमारी स्नेहा, सौ सीमा, ममता मावशी

आदी परिचारिकांना फॉउंडेशनच्या अध्यक्षा मा. सौ रुपालीताई शिंदे यांच्या हस्ते जागतिक परिचारिका दिनाचे सन्मानचिन्ह देऊन त्यांचा या खास दिनी सन्मान करण्यात आला. क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन च्या कारंजाडे अध्यक्षा.सौ. स्नेहा धुमाळ आणि मा.सौ. अश्विनी पाटील यांनी अथक मेहनत घेतली. यावेळी सर्व परिचारिका व इतर स्टाफ भारावून गेले होते. त्यांनी सौ. रुपाली शिंदे व त्यांच्या सदस्या यांचे मनभरून कौतुक केले व आभार व्यक्त केले. हा कार्यक्रम चांगल्या पद्धतीने संम्पन्न करण्यात आला.









## स्व.वसंतराव चव्हाण यांच्या वचनाची खा.रवींद्र चव्हाण यांच्या कडून पूर्तता

### संरक्षण भिंत बांधकाम पायाभरण शुभारंभ सोहळा संपन्न..खा.रविंद्र वसंतराव चव्हाण

**नांदेड वार्ताहर**

नांदेड*:दि.१३.जिल्यातील नायगाव शहरातील वैशाखी बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने स्व. वसंतराव पाटील चव्हाण साहेब यांनी वचनास कटिबद्ध राहून चव्हाण परिवाराने लिंबूनि कुशीनारा बुद्ध विहार नायगाव बा.या सार्वजनिक बुद्ध विहाराच्या संरक्षण भिंत बांधकाम पायाभरणी शुभारंभ खासदार रविंद्र वसंतरावचव्हाण साहेबांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी श्रीनिवास पाटील चव्हाण (तालुका अध्यक्ष खरेदी विक्री संघ नायगाव),विजय पाटील चव्हाण (उपनगराध्यक्ष नायगाव), संजय पाटील चव्हाण (नगराध्यक्ष प्रतिनिधी नायगाव) उपविभागीय पोलीस अधीक्षक पोपळघट साहेब, ज्येष्ठ पत्रकार सूर्यकांत सोनखेडकर,पोलीस निरीक्षक मार्कड साहेब,गंगाधर सोनकांबळे(नगरसेवक), लक्ष्मण भवरे (पत्रकार), पांडुरंग चव्हाण (माजी नगरसेवक), विठ्ठल बेळगे (नगरसेवक), पंढरी भद्रे (माजी सैनिक) शिवराज गायकवाड,माणिक चव्हाण (तालुका अध्यक्ष),नारायण मदेवाड (नगरसेवक),प्रकाश हनुमंते (पत्रकार) रघुनाथ सोनकांबळे (सामाजिक कार्यकर्ते),रामेश्वर भालेराव,श्रीधर सूर्यवंशी,बंटी सूर्यवंशी यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

## दहावीच्या परीक्षेत सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयाचे घवघवीत यश संपादन

**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** एप्रिल २०२५ मध्ये झालेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले. विद्यालयाचा एकूण निकाल ९७.८७ लागला असून विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातून प्रथम श्वेता विलास दामोदर ९५.००, द्वितीय संजना गणेश लोखंडे ९३.००, तृतीय भाग्यश्री सोमीनाथ मोरे ९२.४०, चतुर्थ अनुष्का एकनाथ लोखंडे ९२.००, तर अनुक्रमे राजकन्या संभाजी मोरे ९१.४०, अनुष्का रामेश्वर पालोदकर ९१.२०, साक्षी शामराव सूळ ९१.०० मिळविले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर पालोदकर, सचिव डॉ राहुल पालोदकर, प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि पुढील शैक्षणिक वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

## एकबुर्जी येथील भिंत कोसळून युवकाचा जागीच मृत्यू



**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**

राळेगाव - तालुक्यातील एकबुर्जी येथे दि.१२/०५/२०५ ला घडलेल्या दुर्दैवी घटनेत दिवांशू गजानन रोकडे (वय अंदाजे१५) यांचा भिंत कोसळून मृत्यू झाला. घटना सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. आपल्या राहत्या घराजवळील एका जुन्या इमारतीजवळ होते, त्याच दरम्यान अचानक भिंत कोसळली आणि ती त्यांच्या अंगावर पडली. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतीस धाव घेतली व त्यांना जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी भेट देत अधिक तपास सुरू केला आहे. जुनी व जीर्ण झालेली बांधकामं किती धोकादायक ठरू शकतात, याचे हे ताजे उदाहरण आहे. दिवांशू रोकडे हे एक कर्तबगार बालक होते. त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# उपचार वेळेवर न मिळाल्याने आई सह बाळाचा मृत्यू मंडणगड मधील घटणा

**चिपळूण प्रतिनिधी**



मंडणगड तालुक्यातील कुडुक बुद्रुक येथील गर्भवती महिलेला उपचारासाठी घेऊन जात असताना प्रवासादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घटना दि १० मे रोजी घडली. या घटनेनंतर तालुक्यातील आरोग्य विभाग व्यवसस्थापणाच्या कार्यपद्धती वर प्रश्नचिन्ह उपस्थिती केले जात आहेत. या संदर्भात महिलेच्या नातेवाईकांनकडुन मिळालेल्या माहितीनुसार मौजे मंडणगड तालुक्यातील कुडुक बुद्रुक या गावातील विधी संदेश सावणेकर ( वय वर्ष 32 ) या सात ते आठ महिन्याच्या गरोदर होत्या त्यांना अचानक त्रास होऊ लागल्याने कुटुंबातील नातेवाइकांनी त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र देव्हारे येथे उपचारासाठी आणले परंतु वैद्यकीय अधिकारी यांनी पुढील उपचारासाठी रुग्णवाहिकेमधुन ग्रामीण रुग्णालय मंडणगड येथे पाठविण्यात आले परंतु या रुग्णालयात महिलेची प्रकृती अस्वास्थ्यामुळे व खालावल्याने तीला दापोली येथील उपजिल्हा रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले परंतु रुग्णालयात रुग्णवाहिका उपलब्ध झाली नाही तर 108 ही रुग्णवाहिका कॉलसाठी दुसरीकडे गेली होती. तर 102 रुग्णवाहिका विविध कारणांमुळे उपलब्ध होऊ शकली नाही. यामुळे खाजगी रुग्णवाहिका घेऊन दापोली येथे घेऊन जाण्याचा निर्णय घेण्यात आला परंतु प्रवासादरम्यान महिलेसह बाळाचा ही मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

तालुक्यातील या घटनेनंतर तालुक्यात सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध असुनही तालुक्यातील आरोग्य व्यवस्थापन यंत्रणेकडून रुग्णवाहिका का उपलब्ध झाली नाही असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे. आत्यावशयक सुविधेसाठी रुग्णवाहिका आवश्यक असताना ही रुग्णवाहिका का उपलब्ध झाली नाही. असा प्रश्न सर्व सामान्य माणसाला पडला आहे.

## रत्नागिरी येथे आयोजित कृषी तंत्रज्ञान विकास साप्ताह व कृषी विकास परिषदेसाठी राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री आणि रत्नागिरी जिल्याचे पालकमंत्री उदय सामंत याची उपस्थिती

**चिपळूण प्रतिनिधी**



रत्नागिरी येथे आयोजित कृषी तंत्रज्ञान विस्तार साप्ताह व कृषी विकास परिषदेसाठी राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री व रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत उपस्थित होते. रत्नागिरी जिल्ह्यामधे अशा प्रकारचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनात आतापर्यंत ११ हजार शेतकर्यांनी भेट दिली आहे. ही संख्या अजून वाढे असे मत यावेळी पालकमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केले. शेतकर्यांच हित डोळ्यासमोर ठेवून भविष्यात अशा प्रदर्शनाची संख्या वाढवली जाईल अस मत यावेळी मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केल. माझ्या मतदारसंघातील शेतकर्यांना याचा नक्की फायदा होईल. या प्रदर्शनाच उत्कृष्ट नियोजन केल्यामुळे उदय सामंत यांनी आयोजकाचेही कौतुक केले. शेतकर् यासाठी उपयुक्त असणार्या विविध तंत्रज्ञानाचा परिचय कृषी तंत्रज्ञान विस्तार साप्ताह च्या माध्यमातून शेतकर्यांना झाला आहे. शेती मधील नवनवीन प्रयोग त्याचा शेतकर्यांना उत्पादन वाढीसाठी कसा फायदा होईल हे देखील या साप्ताह च्या माध्यमातून शेतकर्यांन पर्यंत पोहचवण्यात आले आहे. शेतकर्यांच्या हितासाठी महायुती सरकार अशा कार्यक्रम ना कायम मदत करेल. आणि भविष्यात सर्वोतोपरी मदत केली जाईल असे हि उदय सामंत यांनी सांगितले. यावेळी मंत्री मंडळातील सहकारी मंत्री भरत शेठ गोगावले व राज्य मंत्री योगेश कदम अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सीमा टकले - काळे यांनी आष्टी प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचा स्वीकारला पदभार



**आष्टी प्रतिनिधी**

आष्टीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या जागी आष्टी ला गटशिक्षणाधिकारी हे पद मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु पुन्हा प्रभारी गटशिक्षणाधिकारी हे पद प्रभारी गटशिक्षणाधिकारी सिमा टकले - काळे यांच्या कडे आले असून नुकताच त्यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला आहे.त्यांच्या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातील विविध स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. गेल्या सात वर्षापासून आष्टीच्या नशिबी प्रभारी गटशिक्षणाधिकारी हे पद असून प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव दिनांक ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले त्यांचे रिक्त जागी गटशिक्षणाधिकारी पद अधिकारी येतील अशी अपेक्षा होती परंतु पुन्हा एकदा आष्टीचे गट शिक्षण अधिकारी हे पद प्रभारी राहिले आहे शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती सीमा टकले काळे प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती मिळाली आहे. त्यांनी नुकताच आपल्या पदाचा पदभार स्वीकारला असून त्यांचे स्वागत करुन शुभेच्छा दिल्या यावेळी त्रिंबक दिंडे सर , राजेंद्र लाड , सतिश मासाळकर, मुख्याध्यापक सोनवणे, चव्हाण, भडके, महेश तावरे, निंबाळकर,बापू शिंदे, बागवान, पाचारणे, वळवले, मनोज यादव , काळे बाळासाहेब,आदी उपस्थित होते.

# गरिमा भूषण थुलकर अड्याळ विद्यालय अड्याळ येथून प्राविण्य सूचित

## पत्रकार संजीव भांबोरे यांनी प्रत्यक्षात घरी भेट देऊन तिचे केले अभिनंदन



**भंडारा वार्ताहर**- पवनी तालुक्यातील अड्याळ येथील अड्याळ विद्यालय अड्याळ विद्यालयाची विद्यार्थिनी घरची परिस्थिती सर्वसाधारण असताना कुमारी गरिमा भूषण थुलकर या विद्यार्थिनीने अड्याळ विद्यालयातून मुलींमधून 92.60% गुण घेऊन शाळेतून मुलींमधून प्रथम व शाळेतून दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली .आज दिनांक 13 मे 2025 ला सायंकाळी 5 वाजता मुलीचे अभिनंदन करण्याकरता प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व दैनिक माझा विदर्भ विभागीय संपादक संजीव भांबोरे यांनी घरी प्रत्यक्ष घरी भेट देऊन अभिनंदन केले. व पुढील उज्वल भविष्याकरता तिला शुभेच्छा दिल्या. याबाबत विद्यार्थिनी कुमारी गरिमा यांच्यासोबत चर्चा केली असता मी सतत 8 तास अभ्यास करीत असल्याचे तिने यावेळी सदर प्रतिनिधी बोलताना सांगितले. पहाटेला चार वाजे उठल्यानंतर सकाळी नऊ वाजेपर्यंत अभ्यासाकडे सतत लक्ष देत असल्याने मला हे यश मिळाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मला अकरावी सायन्स घेण्याची इच्छा असून समोर काय बनण्याची इच्छा आहे यावर प्रश्न उपस्थित केला असता बारावीनंतर अशाच प्रकारचे यश संपादन करून सॉफ्टवेअर इंजिनियर बनण्याची इच्छा असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी त्यांचे मोठे वडील अमोल थुलकर, मोठी आई समीना थुलकर, भाऊ अंकित थुलकर यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

## 'सीबीएसई'च्या दहावीच्या निकालात मुलींनी मारली बाजी

सीबीएसई मंडळ गुणवत्ता यादी, तसेच कोणाला सर्वाधिक गुण मिळाले हे जाहीर करत नाही. तसेच शाळेत किंवा जिल्ह्यात कोणाला सर्वाधिक गुण मिळाले हे जाहीर करू नये, असे सीबीएसई मंडळाने सर्व शाळा व शैक्षणिक संस्थांना आदेश दिले आहेत.

विद्यार्थ्यांनी cbse.gov.in वर आपल्या गुणपत्रिका पाहाव्यात, असे आवाहन सीबीएसई'ने केले आहे.

**मूळ गुणपत्रिका शाळेतून मिळणार**

विद्यार्थी आपली गुणपत्रिका ऑनलाईन पाहू शकतात. मात्र, हे तात्पुरते आहे. विद्यार्थ्यांना आपली गुणपत्रिका आपल्या शाळेतून घ्यावी लागेल.

## दहावीत कोकणच अव्वल

मात्र कोल्हापूर, अमरावती, नाशिक आणि कोकण या चार विभागातील एकाही परीक्षा केंद्रावर कॉपी प्रकरण निदर्शनास आले नाही. तर पुणे, नागपूर, लातूर विभागात प्रत्येकी सात, छत्रपती संभाजीनगर विभागात तेरा, मुंबई विभागात तीन प्रकरणे नोंदवली गेली असल्याची माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली.

दहावीच्या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४६,५७९ विद्यार्थी परीक्षेस बसले, त्यापैकी १४,५५,४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.१० आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून एकूण २८,५१२ खाजगी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २८,०२० विद्यार्थी परीक्षेस बसले होते, त्यापैकी २२,५१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ८०.३६ टक्के आहे.

राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून एकूण २४,३७६ पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २३,९५४ विद्यार्थी परीक्षेस बसले, त्यापैकी ९,४४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व त्यांची एकूण उत्तीर्णतेची टक्केवारी ३९.४४ आहे.

राज्यातील नऊ विभागीय मंडळांमधून नियमित, खाजगी व पुनर्परीक्षार्थी अशी एकूण १६,१०,१०८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,९८,५५३ विद्यार्थी परीक्षेस बसले. त्यापैकी १४,८७,३९९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९३.०४ आहे.

राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून एकूण ९,७८३ दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९,५८५ दिव्यांग विद्यार्थी परीक्षेस बसले असून त्यापैकी ८,८४४ दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची एकूण उत्तीर्णतची टक्केवारी ९२.२७ आहे.

सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल( ९८.८२ टक्के) सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल नागपूर विभागाचा( ९०.७८ टक्के) आहे.

**पुरवणी परीक्षेसाठी १५ मेपासून अर्ज**

दहावी परीक्षेत सर्व विषयांसह उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी श्रेणी किंवा गुणसुधार योजनेंतर्गत लगतच्या तीन संधी उपलब्ध राहतील. तसेच, जून-जुलै २०२५ मध्ये होणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परीक्षार्थी श्रेणीसुधार व खासगीरीत्या बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज १५ मेपासून भरून घेण्यात येणार असल्याचे मंडळाने स्पष्ट केले

**विद्यार्थ्यांना आवाहन**

उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन पद्धतीने अर्ज दाखल करण्यासाठी विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य आहे. त्यानंतर छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून पाच कार्यालयीन कामाच्या दिवसांत संबंधित विभागीय मंडळांकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करणे आवश्यक आहे. याबाबत अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विभागीय मंडळांकेड संपर्क साधावा, असे आवाहन मंडळाने केले आहे.

- राज्यात ४ लाख ९७ हजार २७७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उतीर्ण झाले आहेत.
- राज्यात ३ लाख ६० हजार ६३० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उतीर्ण झाले आहे.
- एकूण ८६ हजार ६४१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊ शकले नाहीत.

## भूषण गवई सरन्यायाधीशपदाचा कार्यभार आज स्वीकारणार

समाजातील सरन्यायाधीश बनणारे दुसरे व्यक्ती असतील. यापूर्वी २००७ ते २०१० दरम्यान न्या. के. जी. बालकृष्णन

पान १ वरून

हे सरन्यायाधीश दलित समाजातील होते.

केंद्रीय कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी 'एक्स'वरून सांगितले की, भूषण रामकृष्ण गवई यांची १४ मे २०२५ पासून सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**६ महिन्यांचा कार्यकाळ**

न्यायमूर्ती गवई यांना ६ महिन्यांचा कार्यकाळ मिळेल. ते २३ नोव्हेंबर २०२५ रोजी निवृत्त होतील. न्यायमूर्ती बी. आर. गवई यांचा जन्म महाराष्ट्रात झाला. त्यांनी विविध न्यायालयांमध्ये आपली सेवा दिली आहे. २०१९ मध्ये त्यांना सुप्रीम कोर्टात न्यायाधीश म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक महत्वपूर्ण निकाल दिले आहेत.

**न्या. गवई हे मूल्यांचे संरक्षण करतील!**

माझे उत्तराधिकारी न्या. बी. आर. गवई हे सर्वोच्च न्यायालयाची मूल्ये, अधिकार व मूळ संवैधानिक सिद्धांत कायम ठेवतील, असा विश्वास सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी व्यक्त केला.

## ऑपरेशन सिंदूर ही पाकसाठी 'लक्ष्मणरेषा'– नरेंद्र मोदी

जाऊन भारतीय जवानांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जवानांचे कौतुक केले. तसेच 'भारत माता की जय' या घोषणेची ताकद जगाने पाहिली, जेव्हा आपल्या बहिणींचे कुंकू पुसले गेले तेव्हा दहशतवाद्यांच्या घरात घुसून त्यांना मारले, असे म्हणत भारत बुद्धांची आणि गुरु गोविंद सिंह यांचीही धरती आहे, असे मोदी म्हणाले.

**'त्या' दाव्याची पोलखोल**

मोदी अशा वेळी आदमपूर एअरबेसवर पोहोचले, जेव्हा पाकिस्तान जगभरात सतत खोटी माहिती पसरवत आहे. पाकिस्तान सातत्याने आदमपूर एअरबेसवर हल्ला करून त्याचे मोठे नुकसान केल्याचा दावा करत होता. पण, पंतप्रधान मोदी स्वतः आदमपूर एअरबेसवर पोहोचल्यामुळे पाकिस्तानचा खोटेपणा जगासमोर उघड झाला.

**'एस-४००' हवाईसंरक्षण प्रणाली सुरक्षित**

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने भारतातील अनेक शहरांवर ड्रोन हल्ले केले, त्याला भारतीय सैन्याने परतून लावले. पण, यानंतर पाकिस्तान सरकार सतत याबाबत खोटा प्रचार करत होता. आदमपूर एअरबेस उडवल्याचे पाकिस्तान सरकार आणि माध्यमांमधून सांगितले जाऊ लागले. पाकिस्तानने आदमपूरमधील 'एस ४००' हवाई संरक्षण प्रणाली नष्ट केल्याचा दावाही केला होता. पण, आता मोदींनी या एअरबेसवर जाऊन 'एस ४००' हवाई संरक्षण प्रणालीसोबत फोटो शेअर केला. पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर या दौऱ्याचे अनेक फोटो शेअर केले आहेत. यामध्ये आदमपूर एअरबेस पूर्णपणे सुरक्षित असल्याचे आणि पाकिस्तानचा दावा पूर्णपणे खोटा आणि निराधार असल्याचे सिद्ध झाले आहे. दरम्यान, या फोटोपैकी एका फोटोमध्ये पंतप्रधान मोदींच्या पाठीमागे 'एस ४००' हवाई संरक्षण प्रणालीदेखील दिसत आहे. यावरुनच हा एअरबेस पूर्णपणे सुरक्षित असल्याचे सिद्ध होते.

## जम्मू–काश्मीरमध्ये तीन दहशतवाद्यांचा खात्मा

जणांची नावे शाहीद कुट्टे आणि अदनान शफी अशी आहेत. तिसऱ्या दहशतवाद्याची ओळख अद्याप पटलेली नाही. शाहीद कुट्टे हा शोपियान जिल्ह्यातील चोटपोरा हीरपोराचा असून मार्च २०२३ मध्ये तो दहशतवादाकडे वळला. तो 'लष्कर-ए-तोयबा'चा म्होरक्या होता.

कुट्टे याचा अनेक दहशतवादी त्याचप्रमाणे राष्ट्रविरोधी कारवायांमध्ये सहभाग होता. हीरपोरामध्ये भाजपच्या सरपंचाच्या हत्येतही त्याचा सहभाग होता. गेल्या महिन्यात पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यापूर्वी प्रशासनाने कुट्टे याचे घर जमीनदोस्त केले होते. शफी हा वांदुना मेलहोरा परिसरातील असून त्याचा एका कामगाराच्या हत्येत सहभाग होता.

## मुंबई, पुण्यासह काही जिल्ह्यांत अवकाळी पावसाची हजेरी

आणि गुरुवारी काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेता हवामान विभागाने गोंदिया, भंडारा, गडचिरोली, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे.

पुढील तीन ते चार दिवसात दक्षिण अरबी समुद्राचा काही भाग, मालदीव आणि कोमोरिन क्षेत्र; दक्षिण बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भाग मान्सून दाखल होण्यास परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती देखील भारतीय हवामान विभागाने दिली आहे.

देशभरात गेले काही दिवस उष्णतेच्या लाटेमुळे वातावरणात मोठे बदल झाले आहेत. त्याचा परिणाम मान्सूनच्या आगमनावरही होणार अशी चिन्हे दिसत आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार, मान्सून यंदा नेहमीपेक्षा आठ ते दहा दिवस आधीच अंदमान-निकोबार बेटांवर पोहोचण्याची शक्यता असून १३ मेपर्यंत मान्सून अंदमानात दाखल होईल असा अंदाज भारतीय हवामान विभागाने यापूर्वी जाहीर केला होता. त्याप्रमाणे मंगळवारी मान्सूनचे अंदमानात आगमन झाले आहे. .

२७ मे रोजी केरळमध्ये मान्सून दाखल होईल, तसेच महाराष्ट्रात मान्सून ६ जूनच्या आसपास येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच येते ५ दिवस महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मान्सून पहिल्या टप्प्यात सरासरीपेक्षा जास्त राहील. जवळपास १०५ टक्के पाऊस पडण्याची शक्यता असून यंदाच्या हंगामात मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यातसुद्धा जास्त पाऊस पडेल, अशी माहिती पुणे वेधशाळेने दिली.

## साई संस्थानच्या तिजोरीत ५०० किलो सोने जमा

काही वर्षांपूर्वी घेतला होता. ज्याला हायकोर्टाचीही मान्यता मिळाली होती. मात्र, या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

साई संस्थानने आतापर्यंत तीन वेळा आपल्याकडील सोन्याच्या वस्तू वितळवून सुवर्ण नाणी तयार केली आहेत. त्यापैकी सुमारे पाच किलो वजनाची नाणी अद्याप शिल्लक आहेत. दरवर्षी केवळ दोन ते तीन किलो सोन्याच्या नाण्यांचीच विक्री होते. हे पाहता नव्याने तयार करण्यात येणाऱ्या नाण्यांची विक्री होण्यासाठी मोठा कालावधी लागणार असल्याने जोखीमही वाढू शकते. त्यापेक्षा हे सोने स्टेट बँकेकडे ठेवावे, अशी मागणी संबंधित याचिकाकर्त्याने केली आहे.

दैनिक महाराष्ट्र जीत
बुधवार दिनांक 14 मे 2025


## संबोधी वानखेडे अनुसूचित जाती समूहातून ९९ टक्के घेऊन जिल्ह्यात प्रथम..

महाराष्ट्र जीत



कारंजा प्रतिनिधी ..महाराष्ट्र शालांत परीक्षा संन २०२४-२ ५चा निकाल आज जाहीर झाला असून त्यात आर.जे चवरे विद्यामंदिर ची विद्यार्थिनी संबोधी संदीप वानखडे हिने ९९ टक्के गुण मिळउन अनुसूचित जाती समूहातून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे आई वडील शिक्षक असून घरातील शैक्षणिक वातावरणात राहून कुटुंबाच्या शैक्षणिक परंपरेचा वारसा संबोधी ने पुढे चालवीत आपल्या विद्यालयाचे आणि आई वडिलांचे नाव उज्वल केले आहे .वडील संदीप वानखडे हे धाकली येथे माध्यमिक शाळेत विद्यादानाचे कार्य करीत असून आई प्राथमिक शिक्षिका आहे लहानपणापासून आपल्या आई वडिलांकडून शिक्षणाचे धडे मिळाल्याने हे यश मिळाल्याचे मत संबोधी हिने आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले तिच्या या यशाबद्दल महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे जिल्हा अध्यक्ष बंडूभाऊ इंगोले, प्रा रामदास देवले, प्रा रामेश्वर भगत,प्रकाश पडघान, गौतम भगत,हरीश भगत ,केशव चव्हाण आदींनी तिचे अभिनंदन केले असून तिला पुढे अभियांत्रिकी शाखेत करिअर करायचे असल्याचे तिने सांगितले आहे

## भोकरच्या 'शाहूची' उच्चांकी यशाची परंपरा कायम ..!

महाराष्ट्र जीत

**भोकर / उत्तम कसबे**

इयत्ता दहावी बोर्ड परिक्षेचा ऑनलाईन निकाल दि १३ रोज मंगळवारी १ वाजता जाहीर झाला असून नेहमीप्रमाणेच याही वर्षी 'श्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च मा.विद्यालय भोकरचा' निकाल ९१.५९ % लागला असून सर्वोच्च निकालाची परंपरा कायम राखली आहे. भोकर येथील श्री शाहू महाराज उच्च मा. विद्यालय हे शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर नाव असून सुरवातीपासूनच या विद्यालयात १००% कॉपीमुक्त अभियान राबवून परीक्षा घेतल्या जातात. यंदा 'शाहू'चे ८५% च्या वर गुण घेणारे ३४ विद्यार्थी, तर विशेष प्राविण्यासह १०१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.शाळेतून प्रथम मानकरी लक्ष्मीकांत विठ्ठलराव (९४.८०), द्वितीय कु.अक्कलवाड श्रेया बालाजी (९४.४०), तृतीय मुनगे ज्ञानराज सुनील (९४.००), कु.चाटलवार श्रावणी किशोर (९३.६०), बाबळे इंद्रजीत बालाजी (९३.४०), सब्बनवार साईराम विठ्ठल (९३.४०), राठोड सुदर्शन शेषराव (९३.४०), जाधव सुरज बालाजी (९३.२०), सूर्यवंशी श्रद्धा बाळू (९३.००), मोरे वैष्णवी गोविंद (९२.८०), वाघे कृष्णकांत केशव (९२.६०), चिटकेशीवार अवनीश गजानन (९२.२०), जाधव तन्मय शंकर (९२.२०), देशपांडे अजिंक्य अमोल (९१.८०),घंटलवाड ओमकार मुकिंदा(९१.००),कु. जाधव वेदिका दत्ता (९१.००), कु.सूर्यवंशी अनुष्का मारोतराव (९०.६०),कु.राठोड अयोध्या अशोक(९०.६०), दर्शनवाड सुमित मारोती(९०.४०), कदम हर्षवर्धन गोविंदराव (९०.४०), भोसले श्रीशैल्य केरबा(९०.२०), जाधव जान्हवी प्रल्हाद (८९.६०), पांचाळ सृष्टी गोविंदराव (८९.६०)

विद्यार्थ्यांच्या या यशात विद्यार्थ्यांबरोबरच श्री शाहू महाराज उच्च विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच पालकांचा सिंहाचा वाटा आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अड. गोविंदरावजी पाटील लामकानीकर, सचिव शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, नूतन सेवाभावी शिक्षण संस्थेचे सचिव श्री कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, उपाध्यक्ष श्री शिवाजीराव पाटील कार्लेकर, सहसचिव श्री राजेश्वरराव वंगलवार, मु.अ. श्री संजय देशमुख कामनगावकर, उप.मु.अ.श्री. कैलास किनेवाड सर,श्री. गोडगे सर, श्री.चव्हाण सर , श्री. सलीम सर ,श्री. शिंदे सर , श्री. शेख सर ,श्री.काळवणे सर, श्री. सावते सर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर बांधवांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## "दर्शन अकॅडमीच्या दहावीच्या विधाथ्याचे धवधवीत यश "

दिनांक १३ मे २०२५, दर्शन अकॅडेमी , देवळालीच्या महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या दहावीच्या विध्द्यांचा निकाल जाहीर करण्यात आला. दर्शन अकॅडेमी इंग्लिश पब्लिक स्कूलचा या वर्षी १० विचा १००% निकाल लागला असून २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शाळेतील विधाथ्ययांनी धवधवीत यश संपादन करून शाळेचे नाव गौरवकिंत केले आहे. १. पालक कुमट ९४.००%, २. सायली पेखळे ९२.६०% , ३. आरव पटेल ९२. ४०% ह्या गुणवंत विधाथ्ययांनी उच्चाक गुणांनी अनुक्रमे प्रथम , व्दितीय , तृतीय क्रमांक पटकावून शाळेचे यश व्दिगुणित केले आहे. सर्वत्र त्यांच्या यशाचे कोतुक होत असून शाळेच्या मुख्यध्यापिका मा . श्रीमती उर्मिला शर्मा संस्थधिपती मा . देवी लख्मीयानी व शिक्षकांनी १० वीच्या गुणवंत विधाथ्याचे मन : पूर्वक कोतुक केले आहे व त्याच्या पुढच्या शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



# श्रीक्षेत्र माहूर येथील श्री.आनंद दत्तधाम आश्रमात पार पडली शिक्षण परीषद.

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**

श्रीक्षेत्र माहूर :दिनांक 9/5/2025 वार शुक्रवार रोजी सकाळी 8 वाजता माहुरनगरीत आनंद दत्तधाम आश्रमात शिक्षण परिषदेचा आरंभ करण्यात आला. सर्वप्रथम शिक्षक व विद्यार्थी वर्ग व भक्तमंडळीसह श्री संत द.भ.प सदगुरू साईनाथ महाराज वसमतकर बरबडेकर यांनी श्री दत्ता महाराज शिक्षण परिषदेच्या प्रारंभी भारत-पाकीस्तान युद्धात धारातीर्थी पडलेल्या जवानांना श्रद्धांजली वाहून या दोन दिवसीय शिक्षण परिषदेची सुरुवात झाली . माहूर येथे स्थित असलेल्या श्री.आनंद दत्त धाम आश्रमाच्या वतीने आयोजित 'शिक्षण परीषद' नुकतीच दि.09/05/2025व दि.10/05/2025या दोन दिवसांत संपन्न झाली.नेहमीच सामाजिक,धार्मिक व शैक्षणिक कार्यात अग्रेसर असलेल्या श्री.आनंद दत्त धाम आश्रमाचे मठाधिपती द.भ.प.सद्गुरु साईनाथ महाराज बितनाळकर तथा वसमतकर आणि त्यांच्या अनुयायांनी या शिक्षण परिषदेच्या माध्यमातून




आरोग्य,शिक्षण आणि व्यवसाय याबद्दल शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन व्हावे या हेतूने शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित केले होते. दि.10मे रोजी पहाटे सर्वप्रथम माहूर नगरातून दत्त नामाचा गजर करत ग्रंथदिंडी व स्वच्छता अभियान राबविण्यात आले.त्यात साईनाथ महाराजांबरोबर अनुयायी,विद्यार्थी,शिक्षक आणि निमंत्रित मान्यवरांसोबत अनेक शिक्षणप्रेमी व नगरवासी सहभागी झाले होते.संपूर्ण माहूर नगरीत ही ग्रंथदिंडी व स्वच्छता अभियान लक्षवेधी ठरले. शिक्षण परिषदेच्या पहिल्या दिवशी माहूर नगर पंचायत चे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. माहूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे यांनी पहिल्या पुष्पात परिषदेस आलेल्या जवळपास तिनशे विद्यार्थ्यांना अभ्यास कसा असावा ?विद्यार्थी कुणास म्हणावे ?शिक्षण का घेणे गरजेचे व शिक्षणानंतर व्यवसायिक मार्गदर्शन तसेच स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर फॅन्सी नखाते यांनी दुसरे पुष्प गुंफतांना आपल्या महत्वपूर्ण मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांनो जागृत व्हा,मोबाईल टाळा,सकाळी लवकर उठून प्रभातकाळी अध्ययन करावे,आई वडीलांची सेवा करावी असा संदेश देत त्यांना बोलकं करण्याचा प्रयत्न केला. या शिक्षण परिषदेच्या दुसऱ्या दिवशी दैनिक लोकपत्र चे संपादक तथा प्रा.डॉ. गणेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना सखोल व परिपूर्ण मार्गदर्शन केले.त्यात ते म्हणाले की,फक्त शिक्षण नोकरी साठी नाही तर एक परिपक्व,सृजनशील आणि समाजशील माणूस घडावा हे शिक्षणांतीचे साध्य असावे. शिक्षण परिषदेच्या उत्तरार्धात श्री. आनंद दत्त धाम आश्रमाचे मठाधिपती तथा महाराष्ट्र राज्याचे स्वच्छतादूत व राष्ट्रसंत आयोजक द.भ.प.साईनाथ महाराज वसमत यांच्या दत्त नाम किर्तनाच्या माध्यमातून अगदी रंजक पद्धतीने शिक्षण परिषदेचे अंतिम मार्गदर्शन करण्यात आले.त्यात आध्यात्मातून शिक्षणाकडे महाराजांनी विद्यार्थ्यांना नेण्यासाठी अनेक दृष्टांत व दाखले देत मार्गदर्शन केले. सदर शिक्षण परिषदेचे सुत्रसंचालन शेषराव पाटील यांनी करताना आपल्या अठ्ठावीस वर्षातील सेवेतील अनुभव कथन करत शिक्षण आणि आजची अधुनिक शिक्षण प्रणाली यांचा परामर्श विद्यार्थ्यांसमोर मांडून त्यांना बोलत केले.तर आभार अनिल सुरोशे यांनी मानले. सदर शिक्षण परिषदेस जिल्हा परिषद हायस्कूल रोही पिंपळगाव येथील मुख्याध्यापक बालाजी थोटवे,संचालक तिडके हिंगोली यांनी परिषदेमध्ये विद्यार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जवाहरलाल जयस्वाल,भाऊराव पाटील हडसणीकर,पुंडलिक हुम्बे सावकार,अनिल सुरोशे, शेषराव पाटील, सुधीर जाधव, भाग्यवान भवरे, विजय घाटे,प्रल्हाद देवडे परभणी यांनी विशेष परिश्रम घेऊन शिक्षण परिषद यशश्वी केली.शेवटी या शिक्षण परिषदेची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## वाई बाजार येथे बुद्ध जयंती उत्साहात साजरी

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**

श्रीक्षेत्र माहूर तालुक्यातील वाई बाजार येथील पंचशील बुद्ध विहारात सोमवार १२ मे रोजी वैशाख पौर्णिमे निमित्त तथागत गौतम बुद्ध यांची २५६९ वी जयंती साजरी करण्यात आली, यावेळी सर्वप्रथम विहारातील तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यानंतर पंचशील विहार परिसरातील महामानव डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून पंचशील धम्मध्वजाचे रोहणकरुन अभिवादन करण्यात आले, या वेळी पत्रकार सुभाष खडसे व ॲड, छंदक वाठोरे यांनीबुद्ध धम्मात वैशाख पौर्णिमेचे महत्व या विषयावर व तथागत भगवान गौतम बुध्दाच्या जिवन चरित्रावर व सध्याच्या चालू घडामोडीवर सखोल मार्गदर्शन केले,यावेळी पंचशील बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष प्रल्हाद खडसे, कार्याध्यक्ष दिलीप पठाडे,अजय खडसे सागर खडसे, गौतम खडसे, अविनाश पठाडे, विशाल खडसे, अनाथपिंडीक कंधारे,



संजय खडसे,संदेश खडसे, प्रदीप खडसे, गोदाजी पाटील, हर्षल खडसे, सिद्धार्थ पारध्ये, सुरज पारध्ये, रोहन पारध्ये,मिलिंद गायकवाड,उन्नताताई पाटील,छबूताई ठमके, सुलोचना खडसे, सीमा खडसे, रेखा खडसे, जयश्री खडसे, छबूताई पठाडे, मीराताई पट्टेकर, संध्याताई पारधे, कल्पना पारधे, प्रतिमा खडसे, मंगला खडसे, दीपमाला खडसे, मनिषा खडसे, बेबीताई तायडे,शेवंताबाई कदम, वाठोरेताई,आदींची उपस्थिती होती,यावेळी धम्म उपाशीका उन्नत्ताताई पाटील यांनी संपूर्ण बुद्ध पूजा पाठ घेतला तर उपाशीका शेवंताबाई शंकरराव कदम, माहूर, यांनी उपस्थितांना खीरदान वाटप केले,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुभाष खडसे यांनी केले तर आभार दिलीप पठाडे यांनी व्यक्त केले,

## फुटबॉल स्पर्धेत प्राविण्य मिळवणारा, राज पाटीलचे शालांत परीक्षेतही सुयश.

महाराष्ट्र जीत



**भिवंडी (सुनील झळके)** अनेक विद्यार्थी त्यांच्या शालेय जीवनामध्ये विविध खेळ व स्पर्धांमध्ये यश मिळवत असतात. असाच भिवंडी तालुक्यातील मुन्हे सारख्या आदिवासी बहुल, ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थी कुमार राज जयराम पाटील यांनी दहावी शालांत परीक्षा 2025 मध्ये 91% गुण संपादन करून घवघवीत व नेत्रदीपक यश मिळवले आहे.

कुमार राज हा रिटा मेमोरियल कल्याण (वेस्ट),वायले नगर (इंग्रजी माध्यम) या शाळेचा विद्यार्थी असून, त्याला फुटबॉल खेळण्याची प्रचंड आवड व छंद असल्याने त्याने शाळेच्यावतीने गोवा राज्यात झालेल्या फुटबॉल स्पर्धेमध्ये यापूर्वी विशेष प्राविण्य मिळवीत शाळेचे नाव उज्वल केले होते. त्याने त्याच्या या आवडत्या फुटबॉल क्षेत्राप्रमाणेच,आता दहावी शालांत परीक्षा 2025 मध्ये 90% गुण मिळवून सुयश प्राप्त केले आहे. त्याच्या या नेत्र दीपक यशामध्ये त्याचे शाळेतील शिक्षक शिक्षिका, आई-वडील, आजी-आजोबा व मामा-मामी यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले. दररोज आठ ते दहा तास रात्री उशिरापर्यंत जागून अभ्यास करणाऱ्या राजच्या प्रयत्न फळ मिळाले. त्याच्या या यशाबद्दल त्याला विचारले असता, मी अभ्यासासाठी अतिशय परिश्रम केले आहे. यासाठी मला जागरण ही करावे लागले होते.परंतु मोबाईल,टीव्ही इत्यादी पासून मी अलिप्त राहून प्रामाणिकपणे अभ्यास केला आणि मला अशाच अपेक्षित पद्धतीचे गुण मिळतील हा आत्मविश्वास होता. असे म्हणत त्यांने पुढे असे सांगितले की, मला इंजीनियरिंग क्षेत्रात करिअर करावयाचे आहे. राजच्या या यशामुळे शाळा शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक शिक्षिका, कुटुंब मित्रपरिवार व समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींनी त्याचे अभिनंदन करून, त्याला शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# बुद्ध जयंती उत्साहात साजरी

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे**

भारतीय बौध्द महासभा तालुका शाखा दारव्हा च्या वतीने तथागत भगवान बुद्ध यांची २५६९ वी जयंती समोवार दिनांक १२ मे २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने दारव्हात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील बंजारा भवन बालश्रामनेर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या निवासी शिबिराची सुरूवात ८ मे २०२५ रोजी झाली या शिबिराचे हे १८ वे वर्ष होते. जिल्हा सरचिटणीस आद. रुपेश वानखडे यांनी दिप प्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन केले यावेळी अध्यक्षस्थानी तालुका अध्यक्ष प्रा. सिध्दार्थ गायकवाड होते या शिबिराला भंते कीर्ती बोधी उमरखेड व केंद्रीय शिक्षण आदी. रविंद्र दारोकार अकोला यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ. प्रशांत बागेश्वर यांनी केले या शिबिरात श्रामनेर



प्रवज्जा विधी , 75 सेखीए , चिवराचे महत्व, डॉ बाबासाहेब आंबेडकरानचे व भगवान बुद्धांचे जिवन चरित्र, डॉ आंबेडकरांनी बौद्ध धर्म का स्वीकारला, पुजा साहित्याचे महत्व, बौध्द धमाचे संदेश वाहक , बौध्दाचे सण व मंगल दिन , बौध्दाची पवित्र स्थळे , डॉ आंबेडकराचा युवकांना संदेश, 22 धम्म प्रतिन्या , बौध्दाची मातृ संस्था आदी विषयांवर सतत पाच दिवस मार्गदर्शन केले. या शिबिरात एकुण 56 श्रामनेर सहभागी झाले होते त्यांना तालुक्यातील चोरखोपडी येथील सतिश गोवर्धन इंगोले, घनापुर येथिल बंटी सुखदेवराव भगत व दारव्हा येथील नितीन भगत यांनी भोजन दिले तर दारव्हा शहरातील उपासकानी नाष्टा व फलाहार दान केले . सन 2006 पासून ते 2025 पर्यंत या 18 वर्षात आतापर्यंत दारव्हात 876 श्रामनेर तयार झाले दिनांक 12 मे 2025 रोजी बुद्ध जयंती निमित्त शहरातील प्रमुख मार्गावरून भिक्खू संघाची भव्य मिरवणूक काढण्यात आली त्यामध्ये श्रामनेर भिक्खू संघ , समता सैनिक दल व बौध्द उपासक व उपासिकानी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला जवळ धम्म रैली चा समारोप झाला तेथे बुद्ध वंदनेचा कार्यक्रम पार पडला. बुद्ध जयंती चा समारोह येथील बंजारा भवनात पार पडला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सिध्दार्थ गायकवाड होते तर प्रमुख उपस्थिती भंते कीर्ती बोधी जी आद. रविंद्र दारोकार आद. रवी भगत आद. गौतम कुंभारे. यावेळी बाल श्रामनेर शिबिराचा समारोप करण्यात आला यावेळी श्रामनेर भिक्खू नी आपले मनोगत व्यक्त केले तसेच उपस्थितानी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अरविंद मनवर यांनी केले तर शिबिराथीना प्रमाणपत्राचे वाटप प्रा. अमोल कांबळे यांनी केले. सरनतय गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली. वरील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. सिध्दार्थ गायकवाड, जिल्हा सचिव प्रा. डॉ प्रशांत बागेश्वर , कोषाध्यक्ष डि.वाय खडसे उपाध्यक्ष आद. शालीगाराम गवई सर, अजाबराव खंडारे, मेजर नितीन भगत, आद. महेंद्र अघमे, प्रा गौतम मनवर, प्रा अरविंद मनवर, प्रा अमोल कांबळे, आद.राजु मनवर , आद. निळुभाऊ इंगळे, आद रमेश चक्रे, आद. सम्यक इंगळे, आद. महेश चक्रे,आद. विजय गजभिये आद.विजय तायडे. आद. साहेबराव इंगोले, आद. विजय डोंगरे , अनिल इंगळे, अविनाश भगत इत्यादी परिश्रम घेतले..

# आर. जे. चवरे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी रोवला मानाचा तुरा..!

### संबोधी वानखेडे अनुसूचित जाती समूहातून जिल्ह्यात पहिली.

महाराष्ट्र जीत

**कारंजा (लाड),**

दिनांक १३ मे २०२५ रोजी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल घोषित झाला. त्यात आर. जे. चवरे हायस्कूल, कारंजा (लाड)चा निकाल दरवर्षीप्रमाणे यंदाही १०० टक्के लागला. यात विद्यालयाची संबोधी संदीप वानखेडे हिने अनुसूचित जाती समूहातून जिल्ह्यात पहिला येण्याचा मान मिळालाय त्यामुळे विद्यालयाचे नाव जिल्ह्यात कोरले गेले आहे.संबोधी हिने आपल्या यशाचे श्रेय शिक्षक असलेल्या आई वडील वर्गशिक्षक मुख्याध्यापक यांना देते.यावर्षी विद्यालयातून परीक्षेसाठी एकूण ७३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्या विद्यार्थ्यांपैकी ४८ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेच्या यशाची कमान उंचावली. प्रवीण्य श्रेणीमध्ये ६८ विद्यार्थी व प्रथम श्रेणीमध्ये विद्यार्थी 5 उत्तीर्ण झाले. उल्लेखनीय बाब म्हणजे संस्कृत विषयात २४ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण संपादन करून यशाचा शिक्कामोर्तब केला. तर विज्ञान विषयात ४ व गणित विषयात १ विद्यार्थ्याने १०० पैकी १०० गुण संपादन केले.

**विषयनिहाय प्राविण्य खालील प्रमाणे**

मराठी विषयात प्रावीण्य श्रेणी - ६५, संस्कृतमध्ये प्रावीण्य श्रेणी ६७, इंग्रजीमध्ये सर्वच ७३, गणित विषयात ६०, विज्ञान विषयात ५८ आणि सामाजिकशास्त्र विषयात ६२ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

कृष्णाली राजेश पाटील १००%

श्रावणी काळे ९९.६०%, यज्ञेश ठाकरे ९९.६०%,

ज्ञानेश कदम ९९.४०%, सान्वी



संबोधी वणखडे

जवाहरमलाणी ९९.२०%, अदिती वानखडे ९९%, संबोधी वानखडे ९९%, शिरीष काळे ९८.८०%, तन्मय चौधरी ९८.६०%, प्रशस्ती सवई ९८.६०%, दीप बाभुळकर ९८.२०%, जिज्ञासा चौधरी ९७.६०%, साधना जाधव ९७.२०%, तनिषा चारथळ ९७.२०%, गुंजन वासनकर ९७.२०%, आर्या भगत ९७%, सर्वज्ञ वानखडे ९७%, कृपा पिंपळे ९६.६०%, अथर्व ठाकरे ९६.६०%, अक्षरा मुंदडा ९६.४०%, श्रिया पापडे ९६.४०%, वेद आलोने ९६.२०%, आर्या भुजबळे ९६.२०%, आदित्य घोटणे ९५.६०%, दिव्या धाडवे ९५.६०%, अर्पित खेमवाणी ९५.४०%, तेजस मेहेत्रे ९५.२०%, अवंती गुल्हाने ९५.२०%, स्नेहा पुसांडे ९५%, सई धोटे ९४.८०%, वरूण तारवाणी ९४.८०%, शरयू अग्रवाल ९४.४०%, पार्थ चौधरी ९४.२०%, अंकुश कटारिया ९३.४०%, सुजित धांडे ९३.२०%, सुजल दिघडे ९३.२०%, शरयू आळसपुरे ९३%, दिशिता अग्रवाल ९२.८०%, तुषार म्हातारमारे ९२.४०%, मोह. रमीझ घानिवाले ९२.४०%, अथर्व मुंदे ९२%, देवश्री पुंड ९१.८०%, मेघराज वनारसे ९१.८०%, प्रथमेश शंकरपुरे ९१.८०%, अनस हुसेन शेख ९१.४०%, सुविर संपत ९१.२०, निलय सोनटक्के ९०.२०% आणि गीताई इंगोले ९०% असे गुण प्राप्त झाले. विद्यार्थी शिक्षक व पालक यांनी केलेल्या परिश्रमामुळे आज ह्या विद्यार्थ्यांना घवघवीत यश प्राप्त करता आले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कारंजा एज्युकेशन सोसायटी, संचालक मंडळाचे सचिव अमल चवरे, कारंजा एज्युकेशन संचालक मंडळ सर्व सदस्य, जे.सी. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य, पर्यवेक्षक, आर. जे. चवरे हायस्कूलच्या मुख्याध्यापिका, आर.जे. चवरे कॉन्व्हेंटच्या प्रभारी मुख्याध्यापिका, शिक्षक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## तळा येथे अनंत गोपाळ मोरे यांच्या अध्यक्षतेखाली तथागत गौतम बुद्ध जयंती उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

महाराष्ट्र जीत

**बोरघर / माणगांव ( विश्वास गायकवाड )** जगाला शांतीचा व दुःख मुक्तीचा सन्मार्ग बहाल करणारे महान जागतिक मनो वैज्ञानिक तथागत गौतम बुद्ध यांचा २५८८ वा जयंती महोत्सव दि.१२ मे २०२५ रोजी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौध्दमहासभा तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा यांच्या संयुक्त विद्यमाने मु.तळा भारतीय बौध्दमहासभा तालुका शाखा संपर्क कार्यालय या ठिकाणी बौद्धजन पंचायत समिती तालुका तळा अध्यक्ष अनंत गोपाळ मोरे यांच्या अध्यक्षते खाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मानव आदर्शांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व सुत्रपठण संस्कार उपाध्यक्ष नरेश मोरे यांनी केले. तथागत बुद्ध यांच्या जीवन चरित्रावर भारतीय बौद्ध महासभा तालुका तळा महिला अध्यक्षा सुषमा शिंदे यांनी सुंदर असे गायन केले, तद्नंतर सुधीर शिंदे, बौध्दजन पंचायत समिती कोषाध्यक्ष पांडुरंग गवाणे, भारतीय बौद्ध महासभा तळा तालुका अध्यक्ष रामदास शिंदे, मधुकर नाक्ते, सुमन सकपाळ यांनी बुद्ध जयंती व बुद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या, याप्रसंगी संघटक सुरेंद्र शेलार व धम्म प्रचारक वसंत कासारे यांनी प्रमुख व सुंदर असे मार्गदर्शन केले. या जयंती निमित्ताने तळा तालुका भारतीय बौद्धमहासभा



सरचिटणीस गणपत जगताप, तरूण कार्यकर्ते यश जसवलकर तसेच प्रकाश लोखंडे, गणेश पवार,दगडू शेलार, रंजना कासारे आदी मान्यवर पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका उपस्थित होते, या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बौद्धजन पंचायत समिती तालुका तळा सचिव प्रा.सचिन गवाणे सर यांनी केले. या प्रसंगी सरणत्तय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.